दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १९३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१३ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## ऋतुजा लटके यांच्या उमेदवारीचं भवितव्य कोर्टाच्या निर्णयावर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून शिवसेनेचे दिवंगत नेते रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके या इच्छुक उमेदवार आहेत. मात्र, त्यासाठी त्यांनी दिलेला राजीनामा अद्याप पालिकेकडून स्वीकरण्यात न आल्यामुळे लटके यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घेण्याचं निश्चित करण्यात आलं आहे. बुधवारी न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्यासमोर लटके यांची याचिका सादर करण्यात आली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून दिवंगत रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालेलं आहे. तेव्हा उमेदवारी अर्ज भरण्याआधी त्यांनी मुंबई पालिका प्रशासनाकडे आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. तो राजीनामा तातडीनं मंजूर करावा यासाठी त्यांनी नियमानुसार एका महिन्याचे वेतनही पालिका कोषागारात जमा केलं. मात्र पालिका प्रशासनानं अद्याप त्यांचा राजीनामा मंजूर केलेला नाही.

# मोरा ते भाऊचा धक्का रो-रो सेवा २०२३ पर्यंत मार्गी लागणार

## वर्क ऑर्डरनंतर मशिनरीही बंदरात दाखल झाल्याने प्रवाशांची प्रतिक्षा संपणार

**दै.रायगड नगरी । उरण**

**मागील काही वर्षांपासून अवघ्या उरण परिसरातील नागरिकांना प्रतीक्षा लागुन राहिलेली उरण - भाऊचा धक्का दरम्यानची रो-रो सेवा दिवाळी २०२३ पर्यंत सुरु होणार आहे. ७५ कोटी खर्चाच्या या कामाची वर्क ऑर्डरही देण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली आहे.**

उरण- मोरा ते भाऊचा धक्का दरम्यान अवघे नऊ किमी इतके सागरी अंतर आहे. मुंबईपासुन अगदी जवळ आणि रहदारी, गर्दी आणि प्रदुषणमुक्त असलेल्या या सागरी जलमार्गावरुन दररोज हजारो नागरिक प्रवास करतात. तासाभरात मुंबई गाठणे सहज शक्य होत असल्याने या जलमार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्याही मोठी आहे. यामध्ये कामगारांचाही समावेश आहे.यामुळे या सागरी मार्गावर मागील ७० हून अधिक वर्षांपासून प्रवासी वाहतूक करीत असलेल्या खासगी लाँचसाठी नेहमीच गर्दी असते.

त्यामध्ये आता जेएनपीए बंदर आणि या बंदरावर आधारित असलेले सीएफएस, कंपन्यांची भर पडली आहे. जेएनपीए बंदर, ओएनजीसी आणि या बंदरावर आधारित असलेले सीएफएस, कंपन्यांकडे विविध कामांसाठी येणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे.

मुंबईहून जेएनपीए बंदर परिसरात येणाऱ्या कामगारांना येण्यासाठी ७० - ८० किमी अंतर पार करावे लागते. यासाठी साडेतीन ते चार तास लागतात. वाहतुक कोंडी समस्या उद्भवल्यास आणखी ज्यादा वेळही खर्ची पडतो. त्याशिवाय इंधनावरही अतिरिक्त खर्च करावा लागतो. त्यामुळे उरण- मोरा ते भाऊचा धक्का दरम्यान खासगी प्रवासी लॉचसेवेवरील ताण कमी करण्यासाठी आणि वेळ,इंधनावर होणारा खर्च कमी करण्यासाठी उरण- मोरा ते भाऊचा धक्का दरम्यान रो-रो सेवा सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली आहे.

उरण- मोरा ते भाऊचा धक्का दरम्यान सुरू करण्यात येणाऱ्या आणि केंद्र सरकारच्या सागरमाला या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत प्रकल्पाला राज्यशासनाच्या संबंधित विभागाकडून पाच वर्षांपूर्वीच मंजुरी देण्यात आली आहे. या रो-रो योजने सेवाअंतर्गत २० ते ३० वाहन क्षमतेची वाहतूक करणाऱ्या बोटींचा वापर केला जाणार आहे.

त्यामुळे कामगार, प्रवाशांना आपल्या वाहनांसह तासात मुंबई गाठणे सहज शक्य होणार आहे. उरण- मोरा ते भाऊचा धक्का दरम्यान सुरू करण्यात येणाऱ्या या प्रस्तावित रो-रो सेवेमुळे वेळ, इंधनावर होणारा खर्चही कमी होण्यास मदत होणार आहे.

कामगार, प्रवाशांना दिलासा देणारा आणि मुंबईत अर्धा-पाऊण तासातच पोहचण्यास मदत करणाऱ्या केंद्र सरकारच्या सागरमाला या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत प्रस्तावित प्रकल्पावर ७५ कोटी खर्च होणार आहे. राज्य सरकारच्या मंजुरी नंतर सदर प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात आला होता. केंद्राच्या मंजुरीनंतर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या कामाची वर्क ऑर्डरही देण्यात आली आहे. वर्क ऑर्डर नंतर पायलिंगच्या कामासाठी मशिनरीही बंदरात दाखल झालेली आहे. दिवाळी २०२३ पर्यंत रो-रो सेवा सुरु होईल असा ठाम विश्वासही महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी व्यक्त केला आहे.

## सीपीआयचे नेते मातोश्रीवर, शिवसेनेला दिला पाठिंबा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कधीकाळी मुंबईतील कामगार, मराठी बहुल भागाने आणि मुंबईसह महाराष्ट्राने शिवसेना आणि कम्युनिस्ट पक्षातील संघर्ष पाहिला. त्याच मुंबईने आज वेगळे चित्र पाहिले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने आज शिवसेना ठाकरेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीसाठी पाठिंबा दिला. भाकप नेत्यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्याने राज्यातील राजकारणातील एक वर्तुळ पूर्ण झाल्याचे म्हटले जात आहे.



राज्यात मोठ्या प्रमाणावर राजकीय घडामोडी सुरू आहेत. शिवसेनेत फूट पडल्यानंतर अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. या पोटनिवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गटाला भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पाठिंबा दर्शवला आहे. आज दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन भाजपविरोधातील निवडणुकीला पाठिंबा दर्शवला. भाकपच्या शिष्टमंडळात ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते प्रकाश रेड्डी, मुंबई सचिव मिलिंद रानडे, प्रकाश नार्वेकर, विजय दळवी, बबली रावत यांचा समावेश होता. तर, शिवसेनेकडून खासदार अरविंद सावंत, आमदार अनिल परब, आमदार रविंद्र वायकर, सुनील प्रभू, रमेश कोरगावंकर आदी उपस्थित होते.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्याने राज्यात नवीन समीकरण होणार का, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहेत. उद्धव ठाकरे यांनी भाजपविरोधात घेतलेल्या भूमिकेचे विरोधकांकडून स्वागत करण्यात येत आहे. त्याशिवाय, हिंदुत्वाची नव्याने मांडणी ठाकरे यांच्याकडून सुरू आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात विरोधक एकवटणार का, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

## ५० लाखासाठी अपहरण झाल्याचा बनाव करणारा तरुण अखेर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

५० लाख रुपयांच्या खंडणीसाठी माझे अपहरण करण्यात आले आहे असा मेसेज मोबाईलद्वारे आपल्या नातेवाईकांना पाठवणाऱ्या एका तरुणास अखेरीस पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांच्या सहकार्याने व तांत्रिक तपासाच्या आधारे त्याला शोधून काढून सर्वांची फसवणूक केल्या प्रकरणी पुढील कारवाई केली आहे.

यतिश शंकर पुजारी (वय २३ रा. उसर्ली खुर्द) याच्या नातेवाईकांनी तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली होती. यतिश हा त्याच्या काकांकडे राहत होता त्याचे काका रिक्षा व्यवसाय करत होते. दरम्यान त्याच्या नातेवाईकांच्या मोबाईलवर यतिशचे अपहरण झाल्याचा मेसेज आल्याने सर्वांची झोप उडाली. अश्या कठीण प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडिक व पोलीस नाईक परेश म्हात्रे यांनी तांत्रिक तपासद्वारे त्याचा शोध सुरु केला. दरम्यान यतिश हा पनवेल येथून रेल्वेने तामिळनाडू येथे गेला त्यांनतर कर्नाटक येथे गेला तेथून त्याने मँगलोर येथे असलेल्या नातेवाईकांना फोन करून माझ्याकडचे पैसे संपले आहेत तरी मी बस मधून प्रवास करत आहे. कंडक्टरच्या गुगल पे ला पैसे पाठवायला सांगितले. त्यानंतर तो आपल्या नातेवाईकांच्या घरी पोचला. मात्र पनवेल येथून बेपत्ता झाल्याची माहिती त्याच्या नातेवाईकांना या पूर्वीच समजली होती त्यामुळे नातेवाईकांनी पनवेल येथे संपर्क साधून तो आमच्या कडे तो आल्याचे त्यांना सांगितले असे असले तरी ५० लाखाच्या खंडणीचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत पोलिसांनी व नातेवाईकांनी त्याला बोलते केल्यानंतर हा बनाव आपणच स्वतःच केल्याचे त्यांनी सांगितल्यावर सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला परंतु, आता त्याला कायद्याच्या चौकटीत सामोरे जावे लागणार आहे हे निश्चित.

### हवामान खात्याने दिला १४ ऑक्टोबरपर्यंत पावसाचा इशारा

## मासेमारी नौका परतल्या

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



रायगडसह राज्याला ऑक्टोबर महिन्यातही झोडपून काढलेल्या पावसाने रविवारी सुट्टी घेतली. तरी १४ ऑक्टोबरपर्यंत राज्यात ठीकठिकाणी पावसाची शक्यता आहे.दोन दिवसांपूर्वी पडलेल्या पावसाने मुरुड मध्ये सर्वाधिक १६१ मि.मि.पाऊसपडून उच्चांक गाठला होता.आता बहुतांशी जिल्ह्यात विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडेल. असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. या इशाऱ्यानंतर बहुतांश मासेमारी नौका परतू लागल्या आहेत. उभी पिके आडवी झाल्याने शेतकरी बांधवांचे नुकसान झाले असून शासनाच्या संबंधित खात्याकडून पंचनामे करण्याची मागणी जोर धरत आहे.

परतीचा पाऊस अद्यापही राज्यात दाखल झालेला नाही. तो गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशसह उत्तरेकडील राज्यात आहे. ५ ऑक्टोबरपर्यंत परतीचा पाऊस महाराष्ट्रात दाखल होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात त्याला लेट मार्क लागला आहे. तर मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद सह विदर्भातील जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

वारंवार होणाऱ्या हवामानातील बदलांमुळे मासेमारी व्यवसाय ठप्प होऊ लागला आहे. त्यामुळे मच्छिमार आर्थिक संकटात सापडले आहेत.समुद्रात मच्छीमारीसाठी गेलेल्या नौका परतु लागल्या आहेत. शेतातील उभे पीक या पावसामुळे बहुतांश ठिकाणी आडवी होवुन नुकसान झाले असल्याने शेतकरी बांधवांच्या चिंतेत भर पडली असून शासनाच्या संबंधित खात्याकडून नुकसानीच्या पंचनाम्याची मागणी जोर धरत आहे.

## श्रीवर्धन येथील एचडीएफसी बँक रोकड अपहार प्रकरणी मोठा खुलासा

### अजून दोन आरोपी फरार असल्यामुळे पोलिसांना अटक करण्यात व्यत्यय

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

**एचडीएफसी बँक श्रीवर्धन शाखा व श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लिपंचतन शाखा याठिकाणी कॅश लावणाऱ्या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी रोकड लंपास करण्याचा प्रकार मागील आठवड्यात घडला होता. सिक्युर व्हॅल्यू इंडिया लिमिटेड या मुंबई भांडुप येथील एटीएमला कॅश पुरवणाऱ्या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी अपहार केल्याचे उघडकीस आले होते. यानंतर श्रीवर्धन पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून पोलीस कोठडी मिळवल्यानंतर सदर आरोपीकडून पोलिसांनी चौकशी केल्यानंतर धक्कादायक बाब समोर आली आहे.**

रायगड जिल्ह्यातील कोलाड येथील एक महिला व माणगाव येथील एक पुरुष यांनी सदरची रोकड दाम दुप्पट करून देतो. असे आमिष दाखवून रोकड लावणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून सदरची रोकड घेतल्याची विश्वसनीय बातमी आहे. सदर एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी आपल्याला दुप्पट पैसे मिळतील व पैसे दुप्पट झाल्यानंतर आपण मुद्दल असलेली रक्कम पुन्हा एटीएम मध्ये लावू ,या आशेने सदर दामदुप्पट करून देणाऱ्या लोकांकडे सदरची रक्कम दिली.

परंतु चार-पाच दिवसांनंतर सुद्धा रक्कम परत न मिळाल्यानंतर, एचडीएफसी बँकेच्या शाखेत पैसे लावलेच नसल्याचे लक्षात आल्यानंतर, हरेश वाघमारे राहणार तळेगाव, माणगाव यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये रितसर फिर्याद दिली होती. आता या प्रकरणातील एक महिला आरोपी व पुरुष आरोपी यांचा शोध श्रीवर्धन पोलीस घेत आहेत. सदर दोन आरोपींना अटक झाल्यानंतरच या प्रकरणाचा पूर्णपणे खुलासा होईल. अशी माहिती श्रीवर्धन पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## परतीच्या पावसामुळे उरण तालुक्यातील भातपीके आडवी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण परिसरात पावसाने मंगळवारी रात्रीपासून विजांच्या कडकडाटासह जोरदार हजेरी लावली. त्यामुळे भात शेतीत मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. तर भात शेती कापणीच्या अंतिम टप्प्यात आली असल्याने अवकाळी पाऊस भातशेतीचा घात केला आहे. जोरदार वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामुळे काही ठिकाणी शेतातील उभे पीक शेतात आडवे झाली आहेत. अनेक ठिकाणी भात पिके तयार देखील झाली आहेत. तर काही ठिकाणी भात पिके अजून तयार होण्याच्या स्थितीत आहेत. दरम्यान काही ठिकाणी तयार झालेल्या भात पिकांची शेतकऱ्यांनी कापणी देखील केली आहे. मात्र या कापणी केलेल्या पिकांची नासाडी झाली.



दरम्यान शेतकऱ्यांना नेहमीच नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत आहे. ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टी अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना जंग-जंग पछाडले आहे. यंदा पावसाने बऱ्यापैकी कृपादृष्टी ठेवल्याने, शेतात चांगलेच पीक बहरले होते. दसरा दिवाळीत शेतकरी भात कापणीचे नियोजन करून, भात कापणीच्या कामाला सुरुवात करतो. मात्र अवकाळी पावसामुळे भात पिकांचे नुकसान होत असल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला असल्याची माहिती सारडे येथील शेतकरी जीवन पाटील यांनी दिली आहे.

## पनवेल महानगरपालिकेच्या ‘स्वच्छ भारत’ सर्वेक्षणच्या ब्रॅन्ड अम्बेसिडरपदी दिलीप वेंगसरकर आणि सागर म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

यावर्षीच्या ‘स्वच्छ भारत सर्वेक्षण’ मध्ये पनवेल महानगरपालिकेने अत्यंत उत्साहाने सहभागी होत , पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्यास सुरूवात केली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या ‘स्वच्छ भारत’सर्वेक्षण २.० मोहिमेच्या जनजागृतीसाठी ब्रॅन्ड अम्बेसिडरपदी प्रसिध्द क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर आणि मराठी इंडियन आयडॉल स्पर्धेचा विजेता सागर म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ‘स्वच्छ भारत’ स्वच्छ सर्वेक्षण २.० सुरू करण्यात आले आहे. शहर स्वच्छ रहावे , नागरिकांना स्वच्छतेची सवय व्हावी, घन कचरा व्यवस्थापन चांगल्या पध्दतीने व्हावे, शौचालयांची स्वच्छता अशा अनेक कार्यक्रमांच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी केंद्र शासनाच्यासवतीने ‘स्वच्छ भारत’हे अभियान राबविले जाते. पनवेल महानगरपालिका सातत्याने ‘स्वच्छ भारत’ सर्वेक्षणामध्ये वरचा क्रमांक पटकावते आहे. यावर्षीही स्वच्छ सर्वेक्षण २०२२ स्पर्धेमध्ये आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते १० लाख



लोकसंख्येच्या गटामध्ये राज्य पातळीवर ३४ शहरांमध्ये पनवेल महानगरपालिकेला ५ वा क्रमांक प्राप्त झालेला आहे .तसेच देशपातळीवर ३८२ शहरांमध्ये १७ वा क्रमांक प्राप्त झालेला आहे. याचबरोबर कचरामुक्त शहरांसाठीचे ३ स्टार व हागणदारी मुक्त शहराचा ODF++ दर्जा प्राप्त आहे. महापालिका स्थापनेपासून उत्तोरोत्तर प्रगती करत यावर्षी सर्वोत्तम क्रमांक प्राप्त केला आहे.

पुढीलवर्षी यावर्षीपेक्षा अधिक चांगले यश महापालिकेस मिळावे यासाठी महापालिका प्रयत्न करत आहे. यावर्षीच्या ‘स्वच्छ भारत’सर्वेक्षण २.० मोहिमे अंतर्गत कचरा विलगीकरणाचे महत्व नागरिकांना पटवून देण्याकरिता ‘स्वच्छता का उपहार’ हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत ‘स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला’या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या जनजागृतीसाठी प्रसिध्द क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर आणि मराठी इंडियन आयडॉल स्पर्धेचा विजेता सागर म्हात्रे महापालिकेस मदत करणार आहेत. याचबरोबरीने नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी प्रसिध्द क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर आणि मराठी इंडियन आयडॉल स्पर्धेचा विजेता सागर म्हात्रे महापालिकेस सहकार्य करणार आहे. यांच्या मदतीने महापालिका स्वच्छतेविषयी विविध उपक्रम राबविणार आहे.

# नवनिर्माण मित्रमंडळ निवी यांच्या कडून मुख्याध्यापक केबीन बांधणी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**दै.रायगड नगरी । माणगाव**


नवनिर्माण मित्रमंडळाची स्थापना ही २०१६ मध्ये झाली असून या मंडळात मुंबई तसेच ग्रामस्थ तरूण नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. हे मंडळ एक सामाजिक बांधलीकी जपत असून आपल्या गावापुरता मर्यादित न राहाता सर्वत्र माणगांव तालुक्यात तसेच इंदापुर विभागात हे मंडळ सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा, या क्षेत्रात काम करत आहे. तसेच गोर गरीब गरजू तरूण तरुणी विद्यार्थ्यांना हे मंडळ आर्थिक मदत लावून त्यांना शिक्षणासाठी पांठबळ देत आहे. अशाच प्रकारे या मंडळाने निवी मुठवली तसेच इंदापुर विभाग असेल या विभागात काही विद्यार्थ्यांना त्यानी शिक्षणासाठी आर्थिक मदत करून दत्तक देखील घेतले आहे. अशाच प्रकारे या मंडळाने रा.जि.प.केंद्र शाळा निवी ही मराठी शाळा पहिली ते सातवी पर्यत असून या शाळेला मुख्याध्यापक यांना बसण्यासाठी केबिन नव्हती ती केबिन कक्ष या मंडळाने अर्थीक खर्च करून सुदंर अशी बांधली आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना यावेळी मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्य देखील वाटण्यात करण्यात आले.

यावेळी नवनिर्माण मित्रमंडळाचे संस्थापक शांताराम बाबरे, अंबाजी जाधव, काशिराम वाघरे, गणपत गायकर, उमाजी वाघरे, मंडळाचे अध्यक्ष राकेश अबाजी जाधव, उपाध्यक्ष खेळूराम वाघरे, सचिव मनेश बाबरे, उपसचिव प्रविण जाधव, खजिनदार सुरेंद्र जाधव, सदेश वाहक शंकर वाघरे, सल्लागार गोपाळ वाघरे, सदस्य अतिष दिघे, सल्लागार महेश बाबरे, उमाजी जाधव,नदकुमार वाघरे, समिर जाधव, ग्रा.प.सदस्य सचिन नाडकर, मुकेश सकपाळ, विस्तार अधिकारी सुरेश म्हात्रे, मुख्यद्यापक संतोष पाटील, सरपंच शर्मिला बडेकर, पो. पाटील मानसी बाबारे, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अंबाजी भोकरे, ग्रा.प.सदस्य शुभागी बाबारे तसेच सदानंद बडेकर निवी गाव अध्यक्ष यावेळी उपस्थित होते.

# परतीचा पाऊस पुन्हा झाला सक्रीय ; भात,नाचणी व वरीची पिके आली धोक्यात

**दै.रायगड नगरी । रोहा**

गेली आठ दिवस वातावरणातील प्रचंड उष्णता व ढगाळ परिस्थितीमुळे परतीचा पाऊस पुन्हा सक्रीय झाला आहे, दोन तीन दिवस सतत मुसळधार स्वरूपात कोसळलेल्या परतीचे पावसाने शेती क्षेत्राला चांगलाच तडाखा दिला असून भाय, नाचणी व वरीची पिके धोक्यात येऊन शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे.



मागील आठ दिवसापूर्वीही अशाचप्रकारे कोसळलेल्या परतीच्या पावसाने हजेरी लावून शेती व शेतकऱ्यांचे नुकसान केले होते. परंतू मागील आठवड्यापेक्षा आता दोन तीन दिवसात मुसळधार स्वरूपात कोसळलेल्या पावसामुळे यावेळी मात्र फार मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. शेती व शेतकरी वर्गावर विविध बाजूने संकटांची मालिका सुरू असतानाच मागील आठवड्या नंतर आता पुन्हा सक्रीय होऊन जोरदार स्वरुपात कोसळलेल्या परतीच्या पावसाने शेतकरी वर्गाचे फार मोठे नुकसान झाले असल्याने शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतीक्षेत्राकडे लक्ष देऊन त्वरीत भात, नाचणी व वरी पिकांचे पंचनामे करून शेतकरी वर्गाला जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देऊन शेतकरी वर्गाला संकटकाळात मदतीचा हात पुढे करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे. रोहा तालुक्यातील धानकान्हे येथिल बाधित शेतकरी पांडुरंग गोसावी यांनी आपली व्यथा मांडताना शासनाकडे वरीलप्रमाणे मागणी केली आहे.

# पेण आर. टी.ओ. परिवहन समितीची प्रथम सभा माणगांव येथे संपन्न

**दै.रायगड नगरी । माणगाव**

सदर्भीय शासन परिपत्रक नियम क्र.५(२) मधील तरतुदीनुसार शालेय मुलाची ने आण सुरक्षितपणे कशी करणे याबद्दल शालेय समितीची प्रथम सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पेण आर. टी ओ. ईन्स्पेक्टर उचगावकर साहेब, पेण आर. टी. ओ. ईन्स्पेक्टर नंदन राऊत, माणगांव उपपोलीस निरीक्षक गायकवाड साहेब, माणगांव पोलीस राम डोईफोडे, माणगांव वाहतूक शाखेचे अंमलदार दिपक शेरकर साहेब, माणगांव शिक्षण केंद्र प्रमुख सुरेश म्हात्रे, माणगांव शिक्षण केंद्र प्रमुख ओव्हाळ, सुधाकर नारायण शिपूरकर इंग्लिश मेडियम स्कूल प्रिन्सिपल मनीषा मोरे मॅडम,प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ चे माणगांव तालुका पत्रकार अध्यक्ष सचिन पवार त्याच प्रमाणे माणगांव तालुका बस युनियन अद्यक्ष,व बस चालक मालक, शालेय बस समितीचे अध्यक्ष असलेले मुख्याध्यापक, पालक शिक्षक संघचा प्रतिनिधी शालेय बसचे कत्राटधार धाराचा प्रतिनिधी असे या सभेला उपस्थित होते.

माणगांव शिक्षण प्रसारक मंडळच्या सुधाकर नारायण शिपूरकर स्कूल येथे आयोजीत केलेल्या माणगांव तालुक्यातील सर्व शालेय स्कूल समितीची प्रथम सभेचे पेण आर. टी. ओ. साहेबांनी मौलाचे मार्गदर्शन केले ततपूर्वी सुधाकर नारायण शिपूरकर स्कूल च्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा मोरे मॅडम यांनी आलेल्या सर्व मान्यवराचे पुलगुच्छ देऊन स्वागत केले. पेण आर. टी. ओ. एन्स्पेक्टर नदंन राऊत साहेब यांनी सर्व माणगांव तालुक्यातील शालेय कमिटी ला आयोजीत केलेल्या विषयावर मार्गदर्शन केले. बसमध्ये येणाऱ्या सर्वच्या विद्यार्थीची यादी संपूर्ण पत्ता मोबाईल नंबर रक्तगट इत्यादी माहिती अद्यायवत असणे गरजेचे आहे. असे स्पष्ट केले. बसची आवश्यक ती कागदपत्रे वेद्य असणे आवश्यक आहेत. बस वाहन चालवीनेच्या पाच वर्षाचा अनुभव असणे. बस चालू असताना पालकाचे चालकास मोबाईल वर बरेच फोन येत असतात त्यामुळे चालकाने मोबाईल वापरू नये असल्यास आपल्या सोबत असणारा मदतनीस यांच्याकडे द्यावा.

त्याचप्रमाणे बस असणारे आशनक्षमता पेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक करणे टाळावे पालक स्वतः विद्यार्थीना शाळेत ने आण करतात त्या व्यतिरिक्त इतर खासगी सवगातील उदा. जीप, रिक्षा, मॅजिक, इको या सारख्या वा–हनातुन विद्यार्थी वाहतूक होणार नाही याची काळजी शाळेने घेणे आवश्यक आहे. जरं का असं कोणी आढळून आल्यास त्याच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार याची नोंद घ्यावी अशा पद्धतीने माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे सुधाकर नारायण शिपूरकर स्कूल मध्ये प्रथम सभेच्या परिवहन समिती मध्ये सांगण्यात आले अशा पद्धतीने पेण आर टी ओ उचगावकर, राऊत, माणगांव पोलीस उप निरीक्षक गायकवाड, माणगांव वाहतूक शाखेचे अंमलदार दिपक शेरकर व केंद्र प्रमुख ओव्हाळ, आणि म्हात्रे सर यांनी माणगांव तालुक्यातील स्कूल बस चालक मालक, शिक्षक प्रतिनिधी शालेय मुख्याधपिका, तसेच पालक वर्गाना सूचना दिल्या या कार्यक्रमांची सांगता सुधाकर नारायण शिपूरकर स्कूल च्या प्रिन्सिपल सौ. मनीषा मोरे मॅडम यांनी आभार व्यक्त केले.



# क्रिकेटच्या जुन्या वादातून लोखंडी रॉड व बांबुने मारहाण ; गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जुन्या क्रिकेटचा वाद व खारघर पोलीस ठाण्यात झालेल्या तक्रारीचा मनात राग धरून लोखंडी रॉडने व बांबूने मारहाण केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात योगेश जाधव व विनायक जाधव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजय प्रकाश भातोसे हे ओवे कॅम्प येथे राहतात. गावातील भावकीतील मित्र सागर भातोसे व त्यांच्या परिवाराशी अजयचे चांगले संबंध आहेत. ओवे गावातील योगेश जाधव व विनायक जाधव यांच्यासोबत क्रिकेट वरून आपसात वाद झाले होते. सागर भातोसे व योगेश जाधव वर क्रिकेटवरून शिवीगाळ होऊन खारघर पोलीस ठाण्यात एकमेकांविरुद्ध तक्रारी दाखल आहेत. अजय व सागर भातोसे हे वैभव हॉटेल रोहिंजळ नाक्याजवळ चायनीज खाण्यासाठी थांबलेले असताना योगेश जाधव व विनायक जाधव हे हॉटेलमध्ये बसले होते व दोघांना विनाकारण टोमणे मारत होते. यावेळी उगाच कारण नसताना टोमणे का मारतात असे म्हटले असता योगेश जाधवने लोखंडी रोडने अजय याला मारहाण केली. त्यानंतर योगेशने सागरला देखील मारहाण केली व त्या ठिकाणी पडलेली बियरची हिरव्या रंगाची बाटली फोडून उजव्या हाताच्या मनगटाच्या वरच्या बाजूस मारली. फुटलेल्या बियरच्या बाटलीची पडलेली काच उजव्या हाताच्या पंजाला लागली आहे. त्यानंतर येथे असणारा राकेश जाधव यांनी त्यांना आयुष हॉस्पिटल ओवेगाव येथे उपचारासाठी दाखल केले.


## CHANGE OF NAME

My old Name was **Meena Gopal Sawant** As per Affidavit No. 13636/22, Dt.11/10/2022 I will be known as **Mrs.Swapnali Suryakant Desai (New Name)** R/at : Shree Mata Apartment Room No.205, 2 nd Floor, Near Jari Mari Mandir, Pali Devad, Sukapur, New Panvel (E.), Tal-Panvel, Dist-Raigad-410206

**Mrs.Swapnali Suryakant Desai**
**(Sd/- New Name)**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही श्री.प्रदीप शशिकांत केणी यांच्या मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील जमीन मिळकत आहे. तसेच सदरची जमीन ही आमचे अशिलांनी वर नमूद जमिनीचे मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| तळोजे मजकूर | १२५/२/क | ०–०८–६० | ०.२५ |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, समझोता करार, हुकूमनामा, कुळ हक्क, वारसा या प्रकरचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.१२/१०/२०२२

सही/–
**ॲड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा–पाचनंद, न्यू भारत राईस मिल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०८**
**मो.नं.९२२२२२२७१६**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही १) श्री.अरुण बाळाराम केणी, २) श्री.नाथा बाळाराम केणी, ३) सौ.अलका गोपीनाथ चौधरी यांच्या मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील जमीन मिळकत आहे. तसेच सदरची जमीन ही आमचे अशिलांनी वर नमूद जमिनीचे मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| तळोजे मजकूर | १२४/१/अ/३ | ०–१५–०० | १.६२ |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, समझोता करार, हुकूमनामा, कुळ हक्क, वारसा या प्रकरचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.१२/१०/२०२२

सही/–
**ॲड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा–पाचनंद, न्यू भारत राईस मिल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०८**
**मो.नं.९२२२२२२७१६**



अर्जदाराचे वकील : ॲड.अनिल सुभाष जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.११२६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१४/११/२०२२

श्री.प्रकाश भिवा नेरुळकर
वय : ५२, धंदा : शेती
रा.खालची आळी, विठ्ठल मंदिर समोर, पेंधर गाव,
पोस्ट नावडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत चिखले
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार यांच्या आईचे पहिले पती व अर्जदार यांचे सख्खे वडील कै. रामा गोपाळ मेढेकर हे दि.०४/०६/१९७२ रोजी मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मरण पावले आहे. सदरहू अर्जदार यांनी कै.रामा गोपाळ मेढेकर यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

सदरहू कै.रामा गोपाळ मेढेकर वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू कै.रामा गोपाळ मेढेकर यांची मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दि.१२/१०/२०२२ रोजी दिली.

| सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|


# आदिवासी बांधवांना सावा सोलर वॉटरचे वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

सारडे विकास मंच, सुयश, क्लासेस आवरे व साईकृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात, आदिवासी बांधवांच्या आरोग्याचा विचार करत त्यांना ४ लाईफ कंपनीमार्फत सावा सोलर वॉटर पुरीफाय जारचे वाटप करण्यात आले. यासाठी ४ लाईफ कंपनीचे मुख्य शमिंदर कोचर, नेव्हीचे निवृत्त अधिकारी संतोष खंडागळे, वास्तु विशारद जयश्री खंडागे तसेच श्रीमती कोचर मॅडम या सर्वांचे सौजन्य लाभले आहे. या नियोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शमिंदर कोचर यांनी भूषविले होते. तर कार्यक्रमाला कार्याध्यक्ष रोहित पाटील, अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, रामनाथ पाटील, हरीश म्हात्रे, त्रिजण पाटील, महेश पाटील, सुरेश क्लासेसचे निवास गावंड, साईकृपा टेक्नॉलॉजीचे राकेश पाटील आदी जण उपस्थित होते.

# मृतदेह आढळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात रेल्वे कॉलोनीजवळ एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्ष, अंगाने सडपातळ, रंग सावळा, डोक्याचे केस काळे व बारीक, दाढी मिशी वाढलेली असून अंगांत करड्या रंगाची फुल पॅन्ट व काळ्या रंगाचा हाफ ती शर्ट घातलेला आहे.


## ग्रामपंचायत उलवे

**ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर निविदा

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत उलवे हद्दीतील १५ वा वित्त आयोगांतर्गत खालील विकासकामे व खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. १३/१०/२०२२ ते १९/१०/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. २०/१०/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत उलवे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत उलवे येथील उलवे व गणेशपुरी शौचालय दुरुस्ती करणे. स्वच्छता साहित्य पुरविणे | २२५००० |
| २ | ग्रामपंचायत उलवे येथील उलवे अंगणवाडी १ व अंगणवाडी २ व अंगणवाडी गणेशपुरी शौचालय दुरुस्ती करणे. स्वच्छता साहित्य पुरविणे | २२५००० |
| ३ | ग्रामपंचायत उलवे येथील उलवे शाळेतील मुलींना सॅनिटरी पॅड पुरविणे. | ५०१८० |
| ४ | ग्रामपंचायत उलवे हद्दीतील उलवे व गणेशपुरी हद्दीतील उलवे व गणेशपुरी शाळेमध्ये आरओप्लांट खरेदी करणे | २००००० |
| ५ | ग्रामपंचायत उलवे हद्दीतील उलवे व गणेशपुरी हद्दीतील उलवे १, २ व गणेशपुरी अंगणवाडी आरओप्लांट खरेदी करणे | २००००० |
| ६ | ग्रामपंचायत उलवे कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात पिण्याच्या व शौचालयामध्ये पाईपलाईन आरओप्लांट बसवणे | १००१८० |
| ७ | प्रशासकीय खर्च | १५०००० |
| ८ | ग्रामपंचायत उलवे हद्दीतील उलवे व गणेशपुरी रा.जि.प. शाळेसाठी शालेय साहित्य पुरविणे | १००००० |
| ९ | ग्रामपंचायत उलवे हद्दीतील गणेशपुरी शाळा निर्जंतुकीकरण फवारणी करणे | ६६७२७ |
| १० | ग्रामपंचायत उलवे येथील उलवे अंगणवाडी केंद्र १ व अंगणवाडी केंद्र २ व अंगणवाडी केंद्र गणेशपुरी शालेय साहित्य व गणवेश खरेदी करणे. | ६६६९१ |
| ११ | ग्रामपंचायत उलवे गणेशपुरी शाळेतील मुलांना बेंचेस खरेदी करणे | ८३४९२ |
| १२ | ग्रामपंचायत उलवे येथील राजिप शाळा उलवे शाळेतील मुलांना बेंचेस खरेदी करणे. | २००००० |

अटी व शर्ती :–

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

६) साहित्याचे व वस्तूचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत.

| सही/– ग्रामसेवक ग्रामपंचायत उलवे | सही/– प्रशासक ग्रामपंचायत उलवे |
|---|---|


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मोटारसायकलच्या अपघाता नंतर बाचाबाचीत पती-पत्नी जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटारसायकलच्या अपघातानंतर झालेल्या बाचाबाचीत दुसऱ्या गाडीवरील पती पत्नी जखमी झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे.

उन्मेष पाटील (वय ३७ रा. करंजाडे) हे व त्यांची पत्नी असे दोघे जण ॲक्टिव्ह स्कुटरवरून पनवेल कडून करंजाडे कडे येत असताना सुभाष पंजाब लंच होम बाजू–वरील रस्त्यावर दुसऱ्या मोटरसायकलीचा धक्का त्यांच्या गाडीला लागल्याने त्याचा जाब विचारण्यासाठी हे तेथे गेले असता त्या गादीवर असलेल्या तिघांपैकी एकाने त्यांना शिवीगाळ करून त्यांच्या स्कुटरला लाथ मारल्याने ती गाडी उन्मेष पाटील यांच्या पायावर पडून त्यात त्यांना गंभीर तसेच किरकोळ जखमा झाल्या आहेत त्याच प्रमाणे त्यांच्या पत्नीला किरकोळ दुखापत झाली आहे तसेच तात्यांच्या गाडीचे नुकसान करून ते तिघेही पळून गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल; शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## प्रशासकांच्या पुढाकाराने दवाखान्यातील आवारात पेव्हर ब्लॉकचा उपयोग

**दै.रायगड नगरी । माथेरान**

अनेक वर्षांपासून माथेरान नगरपरिषदेच्या अखत्यारीत असलेल्या बैरामजी जिजीभाई या दवाखान्यातील आवारात दगड मातीच्या रस्त्यामुळे रुग्णांना चालणे खूपच कठीण बनले होते. त्यामुळे एखाद्या रुग्णाला हातरीक्षा मधून आण–ताना त्रासदायक बनले होते. याच ठिकाणी नगरपरिषदेच्या सभागृहात नेहमी बैठका आयोजित केल्या जातात त्यावेळी या परिसरात दगडींमुळे अनेकदा ठोकर लागून किरकोळ अपघाताच्या घटना घडल्या आहेत.

याकामी नगरपरिषदेच्या प्रशासक तथा कार्यतत्पर मुख्याधिकारी सुरेखा भणगे ( शिंदे) यांनी मुख्य रस्त्यावर असणारे जुने ब्लॉकस काढून त्याचा योग्य वापर दवाखान्याच्या आवारात केला आहे त्यामुळे चालणे अगदी सोयीस्कर होत असून उन्हाळ्यात इथे रुग्णांना धुळीच्या त्रासापासून मुक्ती मिळणार आहे.



# रोहा : कालव्याला सिंचन हंगामात पाणी सोडण्याचे पाटबंधारे विभागाचे लेखी आश्वासन

## सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जाधव यांचे आमरण उपोषण स्थगित

**दै.रायगड नगरी । रोहा**

कालव्याला पाणी सोडलेच पाहिजे या भूमिकेवर ठाम राहात येथिल शेतकऱ्यांनी पाटबंधारे प्रशासनाला निवेदन देऊन त्यामध्ये १५ दिवसांचे अल्टिमेटम दिले होते. या प्रश्नावर सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जाधव यांनी आमरण उपोषणाचा ईशारा दिला होता. जाधव यांच्या आमरण उपोषण इशाऱ्याने प्रशासन चांगलेच हलले. आज बुधवारी रोहा तहसील कार्यालयात झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत आंबेवाडी ते निवीपर्यंतच्या कालव्याला सिंचन हंगामात पाणी सोडण्याची भुमिका प्रशासनाने घेतली. परिणामी सामाजीक कार्यकर्ते राजेंद्र जाधव व ग्रामस्थांनी पुकारलेले आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.



आंबेवाडी ते निवी पर्यंतच्या कालव्याला अनेक वर्षे पाणी नसल्याने हा परिसर वाळवंट होत चालला आहे. येथिल भातशेती इतिहास जमा झाली. विहिरी, बोअरवेल आटल्याने पाणीबाणी होते. कालव्याला पाणी नसल्याने झाडे सुकून मेली. गुरेढोरे, पशुपक्षी पाण्यासाठी तडफडत असतात. पोल्ट्री व्यवसाय, पाण्याचे संकट ओढविले जाते. यासाठी कालव्याला पाणी सोडले जावे, ही मागणी येथिल नागरिकांनी अनेक वर्षे लावून धरली. मात्र पाटबंधारे प्रशासन टोलवाटोलवी करीत आला. कोणालाच पाझर फुटले नाही.

अखेर येथिल नागरिक आणि मुख्यतः तरुण एक झाले. त्यांनी पाण्यासाठी आंदोलन उभे केले. पाटबंधारे विभागाची दिशाभूल पाहता सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जाधव यांनीही आमरण उपो–षणाचे शस्त्र उगारले होते. अखेर ग्रामस्थांच्या आंदोलनाची दखल घेत तहसीलदार कविता जाधव यांनी तहसील कार्यालयात बुधवारी पाटबंधारेचे अधिकारी व ग्रामस्थ यांची बैठक घेतली.

त्या बैठकीला रायगड पाटबंधारेच्या कार्यकारी अभियंता दीपेश्री राजभोज, नायब तहसीलदार राजेश थोरे, भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष अमित घाग, ग्रामस्थ विठ्ठल मोरे, तुकाराम भगत, ज्ञानेश्वर दळवी, सुनील सुतार, संदेश मोरे, जितेंद्र तुपकर, कृष्णा बामणे, दीपक भगत, सुनील बामुगडे, नंदकुमार बामगुडे, किशोर कळंबे, सागर भगत, निखिल मुंढे, अविनाश मोरे, सुयोग वाळंज, अमोल माने, रुपेश साळवी, नितेश बामुगडे, भाई मोरे, मेघेश मोरे, स्वप्निल वाळंज, अनिल खैरे, राम महाडिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी वर्गाने आक्रमक भूमिका घेतल्याने अखेर पाटबंधारे विभागाने कालव्याला सिंचन हंगामात पाणी सोडण्याची भुमिका घेतली. आंबेवाडी ते निवीपर्यंतच्या कालव्याला सिंचन हंगामात पाणी सोडण्याचे लेखी आश्वासन पाटबंधारे विभागाने ग्रामस्थांना दिले आहे. कालवा दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रके तयार करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. निधी मंजूर प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. लॉंग बूम मशीनद्वारे कालव्याची साफसफाई केली जाईल, असे स्पष्ट करीत कार्यकारी अभियंता दीपेश्री राजभोज यांनी दुरुस्ती कामांची माहिती दिली. त्यावर ग्रामस्थांनी अंशत: समाधान व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचन हंगामात पाणी सोडण्यात येईल, असे लेखी पत्र पाटबंधारे प्रशासनाने ग्रामस्थांना दिल्याने कालव्याच्या पाणीसाठीचे घोषीत आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती राजेंद्र जाधव यांनी दिली.

## तांबडमाळ येथे वीज पडून दोन गुरांचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात मंगळवारी (ता.११) विजेच्या कडकडाटासह झालेल्या वादळी पावसात वीज पडून तांबडमाळ येथे दोन गुरांचा मृत्यू झाला आहे.

पशुपालक भागू दगडू झोरे रा. तांबडमाळ (घोटावडे) यांची एक म्हैस वय ५ वर्ष व एक रेडा वय ७ वर्षे हे वीज पडून मृत्युमुखी पडले आहेत. यामुळे झोरे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या दोन्ही जनावरांचे शवविच्छेदन करण्यात आले आहे. तसेच लवकरच पाली तहसील कार्यालयात नुकसानभरपाई प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. अशी माहिती तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रशांत कोकरे यांनी दिली.

## माथेरान पतसंस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्याची शिवराष्ट्र पॅनलला सुवर्ण संधी : सुनील शिंदे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नागरी पतसंस्थेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी व शिवसेना ठाकरे गटाच्या शिवराष्ट्र पॅनलने भाजप , कॉंग्रेस व शिवसेनेच्या शिंदे गटाचा पराभव करीत विजय संपादन केला आहे. या पतसंस्थेच्या निवडणुकीची संपूर्ण जिल्ह्यात उत्सुकता दिसून आली. नागरी पत संस्थेची निवडणूक पतसंस्थेच्या प्रश्नांवर लढली गेली पाहिजे होती ठेवीदारांची सुरक्षितता, थकीत कर्जाची वसुली असे प्रमुख मुद्दे बाजूला सारत केवळ निवडणूक जिंकण्यासाठीच आणि आपली प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी ई–रिक्षाच्या मुद्द्यावर लढवली गेली. अधिक संख्याबळ असणाऱ्या ज्या काही अश्वपालकांचा ई रिक्षाला विरोध असल्याने त्यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता त्यामुळे शिवराष्ट्र पॅनलच्या नेत्यांना घोडेवाल्याना त्यावेळेपुरता का होईना वचन द्यावे ला–गले की, तुम्ही तयारी दाखविल्या शिवाय आम्ही कदापि ई– रिक्षा येऊ देणार नाही व तुम्ही सांगाल त्या रस्त्याचे पेव्हर ब्लॉक्स काढून टाकू तेव्हा कुठे हे घोडेवाले मतदान करण्यास तयार झाले होते.

पिसरनाथ पॅनलचे ज्येष्ठ उमेदवार सुनिल शिंदे यांनी निवडणुकीचे विश्लेषण करताना महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. ई–रिक्षा हा या निवडणुकीचा मुद्दाच होऊ शकत नाही राजकीय नेत्यांना अश्वपालकाना खरोखर मदत करायची असेल तर सुप्रीम कोर्टात त्यांची बाजू मांडायला वकील द्यावा.


ई रिक्षा प्रकरण सुप्रीम कोर्टात न्यायप्रविष्ठ आहे त्यामुळे उगाच त्याना आशेवर ठेऊन त्यांची खोटी दिशाभूल करू नये. कारण ई रिक्षा ही कोणत्याही परिस्थितीत सुरू होणारच आहे आणि ही आता काळ्या दगडावरची रेघ बनली आहे ती कुणीही पुसू शकत नाही आणि सनियंत्रण समितीच्या परवानगीने मागील काळापासून गावात ब्लॉक बसविण्यात येत आहेत ते इथल्या मातीची धूप होऊ नये यासाठी आणि धुळीपासून लोकांना, व्यापारी वर्गाला होणाऱ्या त्रासापासून बचाव करण्यासाठी ब्लॉकच्या रस्त्याची कामे केली जात आहेत.

सात कोटींचा व्यवहार असणाऱ्या पत संस्थेच्या कर्जावरील संस्थेला येणे व्याजाची रक्कम रुपये एक कोटी अडतीस लाख इतकी प्रचंड आहे. संस्थेने चार कोटी रुपये कर्ज वाटप केले असून यातील मोठी रक्कम थकीत आहे. संस्थेकडे साडेचार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत तर दीड कोटींची रक्कम बँकेत जमा आहे. या आकडेवारी कडे पाहिल्यानंतर या नवीन संचालक मंडळाला थकीत कर्जाची वसुली करण्यासाठी युद्धपातळीवर काम करावे लागेल तरच माथेरान मधील ही एकमेव पतसंस्था आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ शकेल. असे पिसरनाथ पॅनलचे ज्येष्ठ उमेदवार सुनिल शिंदे यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

## इमारतीचा स्लॅब कोसळला, सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापुर येथील ज्योती सोसायटीच्या दुसऱ्या मजल्याचा स्लॅब १० ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास कोसळला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. पुनर्विकास रखडल्यामुळे अनेक इमारती जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे नैनाने ताबडतोब पुनर्विकास करण्यासाठी परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.



पनवेल तालुक्यातील सुकापुर हे गाव नवीन पनवेल शहराला लागून आहे. त्यामुळे हजारो नागरिक या ठिकाणी वास्तव्यास आलेले आहेत. परिसरात शेकडोंच्या संख्येने इमारती उभ्या राहिलेल्या असून यातील काही इमारती जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत.

सुकापुर ग्रामपंचायतीने या धोकादायक जाहीर केलेल्या आहेत. मात्र गेल्या दहा वर्षापासून नैना प्रकल्प आल्यामुळे अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडला आहे. याबाबत नैनाने कुठलीही प्रकारची भूमिका स्पष्ट केलेली नाही असे ग्रामपंचायत सदस्य चेतन केणी यांनी सांगितले. ज्योती सोसायटी येथील जे फोर इमारतीचा दुसऱ्या मजल्याचा स्लॅब १० ऑक्टोबर रोजी रात्री नऊच्या सुमारास खाली कोसळला. सुदैवाने यात कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र इमारतींचे स्लॅब कोसळत असल्याने नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

> **पहिल्यांदा नैनाचा निषेध व्यक्त करतो. गेल्या दहा वर्षांपासून नैना प्राधिकरण पनवेल तालुक्यातील २३ गावांमध्ये येऊन ठेपले आहे. अद्यापपर्यंत नैनाने कोणतीही भूमिका रीडेव्हलपमेंट संदर्भात स्पष्ट केलेली नाही. तसेच नैना कार्यालयात री डेव्हलपमेंट संदर्भात कोणत्याही प्रकारची तरतूद नाही. त्यामुळे नैना आमच्या जीवाशी खेळत आहे, नैनाचा आम्हाला बेघर करण्याचा डाव आहे.**
>
> **: ॲड. चेतन केणी, सुकापुर ग्रामपंचायत सदस्य**

> **सुकापुर परिसरात ५० पेक्षा अधिक इमारती धोकादायक अवस्थेत आहेत. ग्रामपंचायतीने याबाबत पाहणी केली आहे व सोसायटीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सांगितले आहे.**
>
> **: योगिता राजेश पाटील, सरपंच, सुकापूर ग्रामपंचायत**

## श्री विरेश्वर तलाव आणि परिसर सौंदर्यकरणासाठी निधी कमी पडू देणार नाही : आ.भरत गोगावले




**दै.रायगड नगरी । महाड**

महाडच ग्रामदैवत लाखो भाविकांच श्रद्धास्थान असणार्या श्री विरेश्वर तलाव आणि परिसर सौदर्य करणास निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही महाडचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी श्री विरेश्वर मंदिर सभागृहात या कामा संदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत दिली.

यावेळी विरेश्वर देवस्थान ट्रस्टचे प्रभारी सरपंच दिपकशेठ वारंगे माजी सरपंच अनंत शेठ दिलीप पाटै सुरेश शिलिमकर सुनिल कविस्कर रमेश नातेकर महाड नगरपालिकेचे मुख्याधिकारी रोडगे नगर सेवक दिपक सावंत सुनिल आगरवाल डॉ . चेतन सुवै नितिन पावले सिध्देश पाटेकर, संजय पवार, पोळ, हेमंत चांदलेकर, निखिल शिंदे, बंधू तरडे आदी उपस्थित होते.

शेकडो वर्षा पासून महाड शहरांत असणार श्री विरेश्वर मंदिराचा एक भाग असणारा तलाव आता दुरुस्थ करणे गरजेच आहे याकरिता राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत या तलावाच्या मजबूती करण आणि सुशोभिकरणाचा प्रस्ताव राज्याचे माजी विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांच्याकडे देण्यात आला होता.

प्रविण दरेकर यांच्या प्रयत्नातून सन २०१९ ला यासाठी शासनाकडून २ कोटी ५० लाख रुपयांची मंजूरी मिळाली होती मात्र यानंतर दोन वर्ष कोरोना लॉकडाऊन मध्ये हे काम स्थगित झाल होत. यानंतर नव्याने मंदिर ट्रस्टच्या वतीने सुधारित आराखडा तयार करून त्यामध्ये मुख्य मंदिराचा सभामंडप ( जुना ) आणि मंदिराच्या दर्शनी भागांत कमानी असा सादर करण्यात आला होता.

यासर्व प्रस्तावा सदर्भात आमदार भरत गोगावले यांनी बुधवारी दुपारी विरेश्वर मंदिर सभागृहात एका आढावा बैठकीच आयोजन केल होत यावेळी मंदिर तलाव आणि परिसर सुशोभिकरणाला शासनाकडून कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू देणार नाही तर आपल्या आमदार निधी फंडातून आपण कमानी करिता निधी मंजूर केल असल्याचही यावेळी आमदार भरत गोगावले यांनी यावेळी सांगितल आहे.

आता विरेश्वर देवस्थान पंच कमिटी मार्फत सादर केलेल्या सुधारित वाढीव प्रस्ताव अंदाज पत्रक सुमारे ५ कोटी ५० लाख रुपयांच असून याप्रकरणी याआदिच ट्रस्टच्यावतीने ७५ लाख रुपये भरून काम लवकर सुरु करण्याचा मार्ग मोकळा केला आहे .या कामाची पहिली निविदा झाली होती पण काही तांत्रिक अडचणीमुळे ती पुण्हा लवकर निघणार आहे सदरचे काम हे महाड नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. या आढावा बैठकीत विरेश्वर देवस्थान पंच कमिटी सरपंच दिलिप पाटै यांनी या सुशोभिकरणा बाबत एक महत्वाचा मुद्दा आमदार गोगावले यांच्याकडे मांडला की सुशोभिकरणानंतर भविष्यात सर्व प्रकारच्या देखभालीचा भार राज्य शासनानी उचलावा अस सांगितल यावर गोगावले यांनी त्याला मान्य केल.

## चारफाटा ते भिसेगाव बिकानेर पर्यत रखडलेल्या रस्त्याबाबत ग्रामस्थांचे आंदोलन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

चारफाटा ते भिसेगाव बिकानेर पर्यत रखडलेल्या कामाबाबत भिसेगाव ग्रामस्थांच्यावतीने सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी यांनी नगरपरिषद प्रशासनास निवेदन दिले आहे, रस्त्याचे अर्धवट काम १५ दिवसात त्वरीत चालू करण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा नगरपरिषदेस दिला आहे.

सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी आणि स्थानिक नगरसेवक सोमनाथ ठोंबरे यांनी कर्जत नगर परिषद प्रशास–नास दिलेल्या निवेदनात गेले कित्येक वर्षेपासून चारफाटा ते भिसेगाव बिकानेर रस्त्याचे काम रखडल्या प्रकरणी अमोघ कुळकर्णी व त्यांचे सहकारी हे १ जून २०२१ रोजी उपोषणास बसले होते त्या वेळी मा सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन प्रो प्रा नरेश अदसानी यांना नगरपरीषद चे तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी उपोषण स्थळी वर्क ऑर्डर दिली होती व त्या नुसार ५ जून २०२१ रोजी या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले होते.



परंतु या वर्कऑर्डर वर १ वर्षाच्या आत या रस्त्याचे काम पूर्ण करण्याची मुदत असून देखील दिड वर्ष ओलांडून या रस्ताचे काम पूर्ण होत नाही या रस्त्यावरून कर्जत चे बस डेपो मधील बस, रेल्वे स्टेशनला जाणारे पादचारी तसेच इतर पंचाकोशीतील गावातील नागरीक व रहिवासी ये जा करण्याकरिता वापर करत आहे असा हा महत्वाचा रस्ता आहे, परंतु ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे या रस्त्याचे काम अर्धवट पडले आहे,सर्वच नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे, या बेजबाबदार ठेकेदार वर विलंबशुल्क आकारण्यात येण्यात यावा तसेच रस्ताचे काम १५ दिवसाच्या आत चालू करण्याचे आदेश देण्यात यावे व काम सुरू करावे अन्यथा १५ दिवसा नंतर मी अमोघ कुळकर्णी व माझे सहकारी तीव्र आंदोलन या रस्तावर करणार असून याचे सर्वस्व जवाबदारी नगरपरिषद प्रशासनाची असेल याची नोंद घ्यावी ही विनंती असे अमोघ कुळकर्णी यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे,

## ग्रामपंचायत उमेदवारांच्या समर्थनार्थ चौकमध्ये भव्य जाहीर सभा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खालापूर तालुक्यातील चौक, लोधिवली, आसरे व तुपगाव या चार ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक येत्या रविवारी असून भाजप बाळासाहेबांची शिवसेना, मनसे व रिपाई (आठवले गट) या परिवर्तन आघाडी अर्थात युतीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ०५ वाजता भव्य जाहीर सभा चौक येथे होणार आहे.

या सभेला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार देवेंद्र साटम, आरपीआयचे नेते जगदीश गायकवाड, शिवसेनेचे उपनेते विजय चौगुले, भाजपचे तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.